महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे
जुने सीआयडी ऑफीसकंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २५५४१५३३
फॅक्सक्रमांक - ०२० - २५५४४६३१
ई मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

# पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे

## पोलीस भरती -२०२१- प्रेस नोट

पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे येथे पोलीस शिपाई भरती सन-२०२१ मधील १२४ पदांची प्रक्रिया सुरु होणार आहे. १२४ पोलीस शिपाई पदावर आवेदन अर्ज सादर करावयाची मुदत दिनांक १५/१२/२०२२ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तसेच खालील वेबसाईट वर दिनांक १५/१२/२०२२ पर्यंत आवेदन अर्ज भरण्यात यावे.

Website- 1.www. policerecruitment2022.mahait.org
2.www.mahapolice.gov.in

(श्रीकांत धिवरे)भा.पो.से
पोलीस अधीक्षक,
लोहमार्ग पुणे.

WPN 6234 01/12/22
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.

# उमेदवारांना सुचना

पोलीस शिपाई / पोलीस शिपाई चालक / सशस्त्र पोलीस शिपाई या पदावर आवेदन अर्ज सादर करावयाची मुदत दिनांक १५.१२.२०२२ रोजी पर्यंत वाढविण्यात येत आहे.

नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) हे दिनांक ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२ या आर्थिक वर्षातील उत्पन्नाच्या आधारावर सक्षम प्राधिकारी यांनी, भरतीसाठी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध राहील.

तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक १२.०२.२०१९ मधील तरतुदींनुसार दिनांक ०१.०४.२०२१ ते दिनांक ३१.०३.२०२२ या आर्थिक वर्षातील उत्पन्नाच्या आधारावर विहित करण्यात आलेले मुळ प्रमाणपत्र सादर करावे. त्यासाठी क्रिमीलेअर प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. तथापि, सदरचे प्रमाणपत्र हे दिनांक ३०.११.२०२२ पुर्वीचे असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई — ४००० ०३२.
Email ID : home_pol5a@maharashtra.gov.in Phone No - 22874009

क्रमांक : पोलीस-११२२/प्र.क्र.२२/पोल-५अ दिनांक :२९/११/२०२२

प्रति,
पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- पोलीस भरती प्रक्रिया- मुदतवाढ देणेबाबत.

सन २०२० व सन २०२१ मधील रिक्त पदे भरण्यासाठी भरतीप्रक्रियेच्या अनुषंगाने दि.०६/११/२०२२ रोजी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडुन जाहिरात प्रसिदध करण्यात आलेली असून उमेदवारांकडुन आवेदनपत्रे स्वीकारण्याबाबत दि.३०/११/२०२२ हा अंतिम दिनांक निश्चित करण्यात आलेला आहे. तथापि, उमेदवारांना आवेदनपत्र भरण्याबाबत येत असलेल्या तांत्रिक अडचणींच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण व्हावे तसेच सर्व उमेदवारांना भरती प्रक्रियेत सहभागी होता यावे या दृष्टीकोनातून प्रस्तुत भरती प्रक्रियेतील अर्ज करण्यास याद्वारे मुदतवाड देण्यात येत असुन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक १५/१२/२०२२ असा असेल.

२. या अनुषंगाने पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांना सुचित करण्यात येते की, प्रस्तुत मुदतवाढीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी तसेच या निर्णयाबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती

(अनिल कुलकर्णी)
सह सचिव, गृह विभाग

प्रत ,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
निवडनस्ती (पोल५-अ)